माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/०००६८६**

**अपिलार्थी श्री. क्षितीज प्रविण देसाई**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२,**
अभिलेख विभाग, मुंबई यांचे कार्यालय, जुने जकात घर,
तळमजला, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,
मुंबई -४०० ०२३.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,**
जुने जकात घर, तळ मजला, शहिद भगतसिंग मार्ग,
फोर्ट, मुंबई -४०० ०२३.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ३०.०४.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २४.१०.२०२४ | २६.११.२०२४ | ०९.१२.२०२४ | १०.१२.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १२.०३.२०२५ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतरही माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २६.११.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १०.१२.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २४.१०.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *Certified Copies of the Indenture (Conveyance) duly registered with the Sub Registrar of Assurances Bombay under Serial No: 790/1983 dated 16th March 1983 along with 3 Copies of Index II executed in between M/s Sea Breeze Estate Development Pvt Ltd {as Chief Promoter of Proposed Versova Oceanic Co-op Housing Society Ltd) and Mr. Sennan James Dsouza, Mr. Joseph Bain Dsouza for the property situated at CTS No. 1298(Part), 1299 (Part) and 1300 (Part) at Seven Bunglow Road, Versova, Andheri (West), Mumbai. The said Document was received by You from The High Court of Bombay on 15th March 1983. The Consent Terms were filed in the High Court and registered by you under registration No. 790/1983 dated 16th March 1983.*

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.११.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, दस्त क्र. ७९०/१९८३ या दस्ताचा शोध घेण्याचे काम प्राधान्याने चालू असून सदर दस्त आढळ होताच आपणास अवगत करण्यात येईल. तसेच सुची क्र.२ हे फाटलेले असून, आपणास सुची क.२ हे पुरविता येऊ शकत नाही. तरी आपला अर्ज या कार्यालयाच्या स्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०९.१२.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.१२.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींनी मागणी केलेल्या दस्ताचा अभिलेखामध्ये शोध घेऊन कार्यालयीन कामकाजाच्या ३० दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावेत असे आदेशित करुन अपील निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दस्ताचा अभिलेखामध्ये शोध घेऊन ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केले होते. तरीही त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

६. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ३०.०४.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी ३ कर्मचाऱ्यांचे स्वतंत्र पथक गठीत करुन दस्त क्र. बॉम/७९०/१९८३ या दस्ताचा शोध घेण्यात आला असता सदरचा दस्त हा मूल्यांकनासाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. त्याअन्वये या कार्यालयाने दि.२२.११.२०२४ अन्वये मा. मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई शहर व दि. १३.०२.२०२५ अन्वये मा. मुद्रांक जिल्हाधिकारी अंधेरी, यांना यांना उक्त दस्ताचे झेरॉक्स प्रत सदर कार्यालयाकडून या कार्यालयास उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केलेली आहे. परंतु त्याबाबत कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही. तसेच उक्त कालावधीमध्ये कार्यालयाचे सुशोभीकरणाचे कामकाज चालू होते. त्यामुळे उक्त कार्यालयीन अभिलेख हे सरमिसळ झाले असल्याने impound register चा आढळ न झाल्याने नेमका दस्त कोठे पाठवला आहे का याचा देखील बोध होत नव्हता तरी उक्त impound register चा आढळ झाल्याने सदर नोंदवहीमधे दस्त क्रमांकाची पडताळणी केली असता सदर दस्त हा मा. प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई शहर येथे मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ३३ अन्वये अटकाऊन वसुलीकरता दि. ०५.०८.१९९६ रोजी पाठवण्यात आला असल्याची नोंद आढळून आली.

त्या अनुषंगाने या कार्यालयाने दि. १३.०२.२०२५ अन्वये सदर दस्ताच्या सद्यस्थितीबद्दल विचारणा केली असून सदर दस्ताची वसुलीची कार्यवाही पूर्ण झाली असल्यास सदरचा दस्त या कार्यालयास लवकरात लवकर परत करण्यात यावा, जेणेकरून दस्ताची पुढील कार्यवाही पूर्ण करून मूळ दस्त अर्जदार यांना परत करण्यात येईल, या बाबत मा. प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई शहर यांना विनंती केलेली आहे. तथापि, अद्याप अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला नसल्याने अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून देता आलेली नाही.

..३/-

७. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी यांनी दि. २४.०५.२०१२ रोजी आदेश पारित करुन संबंधीत दस्तावर मुद्रांक शुल्क निश्चिती केलेली आहे व त्याप्रमाणे मुद्रांक शुल्काचा भरणा केला होता त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी केलेले निवेदन योग्य वाटत नाही. अपिलार्थी यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी यांचे आदेश दि. २४.०५.२०१२ रोजीची प्रत तसेच अपिलार्थींनी भरलेले मुद्रांक शुल्काची माहिती जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिली.

८. जन माहिती अधिकारी यांनी सदर विषयी मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन देण्यासाठी वेळेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी यांची उपस्थिती आवश्यक आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १३.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ३०.०४.२०२६**

प्रत:- माहिती अधिकारी, मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी यांचे कार्यालय, वांद्रे, मुंबई.

राज्य माहिती आयोग